# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## भारत आणि न्यूझीलंड T-२० सामन्याकरिता मेट्रो प्रवासाचे आवाहन

## महा मेट्रो आणि व्हीसीएच्या नियोजन बैठकीत सविस्तर चर्चा

## २१ जानेवारी ला व्हीसीए जामठा येथे रंगणारा टी-२० सामना

नागपूर: भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बुधवार, २१ जानेवारी २०२६ रोजी विदर्भ क्रिकेट असोसिएशन (VCA) स्टेडियम, जामठा येथे होणाऱ्या टी-२० क्रिकेट सामन्याच्या पार्श्वभूमीवर क्रिकेटप्रेमी नागरिकांच्या सोयीसाठी महा मेट्रो तर्फे मेट्रो ट्रेन सेवा रात्री १० वाजताच्या पलीकडे वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामन्याच्या दिवशी मेट्रो सेवा मध्य रात्री १२ वाजे पर्यंत पर्यंत आणि आवश्यक असल्यास त्याही पुढे सुरु ठेवण्या संबंधीचा निर्णय महा मेट्रो प्रशासनाने घेतला आहे.

या संदर्भात आज मेट्रो भवन येथे महा मेट्रोचे संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री. अनिल कोकाटे व विदर्भ क्रिकेट असोसिएशनचे सचिव श्री. संजय बडकस  व पदाधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक पार पडली. या बैठकीत सामन्याच्या दिवशी प्रवाशांचा सुरक्षित, सुलभ व जलद प्रवास सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. क्रिकेट चाहत्यांच्या सोयीसाठी खापरी मेट्रो स्टेशन ते जामठा स्टेडियम या मार्गावर नागपूर महानगरपालिकेच्या बसेस फिडर सेवा म्हणून उपलब्ध असतील.यामुळे रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

सामन्याच्या दिवशी शेवटची मेट्रो ट्रेन खापरी मेट्रो स्टेशनवरून मध्य रात्री १२ वाजता सुटेल. पण आधी सांगितल्याप्रमाणे क्रिकेट प्रेमींच्या गरजे प्रमाणे हि सेवा त्या नंतर देखील सुरु राहील. खापरी येथून प्रवासी ऑटोमोटिव्ह स्क्वेअरपर्यंत थेट प्रवास करू शकतील किंवा सीताबर्डी इंटरचेंजवर ट्रेन बदलून अ‍ॅक्वा लाईनवरील कोणत्याही दिशेने प्रवास करू शकतील. मेट्रो गाड्या दर १० मिनिटांच्या अंतराने धावणार आहेत.

व्हीसीए जामठा स्टेडियम हे न्यू एअरपोर्ट मेट्रो स्टेशनपासून ७ किमी व खापरी मेट्रो स्टेशनपासून ६ किमी अंतरावर आहे. स्टेडियमकडे जाण्यासाठी तसेच सामन्यानंतर परतीसाठी न्यू एअरपोर्ट मेट्रो स्टेशनवरून मनपाच्या बसेस (शुल्क आकारून) उपलब्ध असतील. मॅचनंतर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि सुरक्षित व जलद प्रवासासाठी नागरिकांनी महा मेट्रो सेवेचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन महामेट्रोतर्फे करण्यात आले आहे.